# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालयः स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), जि.ठाणे-401101.
दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in
मुख्य कार्यालय

जा.क्र. : मिभा/मनपा/ वैद्यकीय/926/2021-22 दिनांक : 06/08/2021

प्रति,
**अध्यक्ष,सेक्रेटरी ,**
सहकारी गृहनिर्माण संस्था (सर्व),
मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्र.

**विषयः- कोविड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेले निर्बंध लागू करणेबाबत.**

**संदर्भः-1) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.DMU/2020/C.R.92/DisM-1 दि.04 व 05 एप्रिल 2021रोजीचा आदेश.**
**2) मिरा भाईंदर महानगरपालिका जा.क्र.मनपा/वै.आ./75/2021-22 दि.05/04/2021 रोजीचा आदेश.**

कोविड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये शासन आदेशानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत. संदर्भ क्र.2 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरीकांनी याचे अनुपालन करण्यासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी खालील नमुद केलेल्या निर्बंधांचे पालन करणे आवश्यक आहे.

1) 5 हून अधिक कोरोना पॉझिटिव्ह रूग्ण असणारी कोणतीही सहकारी गृहनिर्माण संस्था लहान कंटेन्मेंट क्षेत्र म्हणून घोषित केली जाईल.
2) अशा सोसायट्या आपल्या प्रवेशद्वारावर माहिती देणारे बोर्ड लावून अभ्यागतांना प्रवेश देणार नाही.
3) कंटेन्मेंट झोन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था सोसायटीच्या आत-बाहेर जाणाऱ्या व्यक्तींची नोंद ठेवेल.
4) कोव्हिड-19 मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन केल्यास प्रथमदर्शनी सोसायटीला रू.10,000/- दंड आकारला जाऊ शकतो. नंतर स्थानिक अधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार जास्त दंड आकारला जाऊ शकतो. हा दंड सोसायटीद्वारे SOP चे पालन सुनिश्चित करण्यासाठी पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांना कामावर ठेवण्यासाठी वापरला जाऊ शकतो.
5) सर्व गृहनिर्माण संस्थांना सुचित करण्यात येते की, इमारतीत नियमितपणे येणाऱ्या सर्व व्यक्तींनी सरकारी नियमांनुसार लसीकरण होईपर्यंत त्यांची आरटीपीसीआर चाचणी करून घ्यावी.

उक्त सूचनांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास सर्व संबधितांवर साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 51 ते 60 अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता, यामधील कलम 188 अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

संगणक विभाग
आवक क्र. 0९
दि. 0९/0४/२०२१

उप-आयुक्त (सा.प्र.)
जा.क्र.मनपा/सा.प्र./ 22 /2021-22
दि. 0९ / 0४ /2021

विषय :- कोव्हीड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेले निर्बंध लागु करणेबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मिभा/मनपा/वैद्यकीय/126/2021-22, दि.09/04/2021 रोजीचा आदेश.

कोव्हीड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी अन्वये शासन आदेशानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी निर्बंध लागु करण्यात आलेले आहेत. तरी सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थाना आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

सदर सोबत जोडलेल्या आदेशानुसार आपण कोव्हीड-19 विषयकच्या सुचना सोशल मिडीया व बेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय आदेशाची प्रत

(विजयकुमार म्हसाळ)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति :-
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\AJIT MUTHE SAHEB\All Letter\All Letters.doc